# शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद.
## Government Polytechnic, Aurangabad.
(An Autonomous Institute of Govt. of Maharashtra)
Osmanpura, Aurangabad
Phone: 2334724 / 2321917 / 2353644 Resi. : 2331562
GRAM: POLYTECH Fax: 2334724
**E-mail:** gpaur@rediffmail.com **website: www.gpabad.ac.in**


---

**सूचना –**

जा.क्र./शातंनिऔ/एक्युएसी/पनिकक्ष/उप-2018/ 67
दिनांक – 28/05/2018

विषय – तिसरे व पाचवे सत्र विषय नोंदणीबाबत सूचना.

शैक्षणिक वर्ष 2018-2019 च्या सत्राची सुरूवात दिनांक 20 जून 2018 पासून सुरू होत आहे. विषय नोंदणीसाठी पात्र ठरलेल्या सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, विद्यार्थी विभागाने निर्देशित केलेल्या वेळापत्रकानुसार त्यांनी त्यांच्या विभागात जाउन खालील पध्दतीनुसार वेळेत विषय नोंदणी करावी. **सत्र शुल्क आकारणी व विषय नोंदणीचे वेळापत्रकाची सूचना विद्यार्थी विभागामार्फत स्वतंत्ररीत्या लावण्यात येईल.**

1. विद्यार्थ्याने गुणपत्रिकेच्या साक्षांकित प्रतिसह विभागात जाउन ऑनलाईन पध्दतीने विषय नोंदणी करावी.
2. ऑनलाईन पध्दतीने तयार झालेल्या अर्जावर स्वत:ची स्वाक्षरी करून तो अर्ज विभागात नेमलेल्या प्राध्यापकांकडून व विभागप्रमुखांकडून साक्षांकित करून घ्यावा.
3. विभागातून कोरे बँक चालान हस्तगत करून त्यावर स्वतचे नाव, नोंदणी क्रमांक, विद्या शाखा इ. तपशील चालानच्या तीनही भागात लिहावा. विद्यार्थी विभागास नोंदणी फॉर्म दाखवून त्यावर निर्धारित शुल्क विद्यार्थी विभागाकडून नोंदवून घ्यावी व शुल्काची रक्कम रोखपालाकडे जमा करावी व विषय नोंदणी अर्ज विभागात जमा करावा.
4. 2018- 19 मध्ये प्रवेशित थेट व्दितीय विद्यार्थ्यांनी त्यांना द्यावयाच्या बॅकलॉग विषयाच्या नोंदणीसाठी विषय रू. 500/- प्रमाणे अतिरिक्त शुल्क (सत्र व इतर शुल्का व्यतिरिक्त) असून नियमित नोंदणी सोबतच जमा करावी व बॅकलॉग विषयांची नोंदणी साठीही वरीलप्रमाणे कार्यवाही करावी. त्यांनी परीक्षा फीस ही भरणे आवश्यक आहे
5. विद्यार्थ्यांची प्रत विद्यार्थ्याने सांभाळून ठेवावी.
6. विभागप्रमुखांच्या स्वाक्षरीने प्रमाणित केलेल्या अर्जासोबत चालान रोखापालाकडे पैसे भरल्याच्या प्रमाणकासह विभागात सादर केल्यानंतरच विषम सत्र (181) 2018-2019 साठीची नोंदणी केल्याचे समजण्यात येईल. त्यास अभ्यासक्रमास प्रवेश दिला जाईल.
   वरील प्रक्रियेचे सर्व संबंधितांनी काटेकोरपणे पालन करावे. विभागप्रमुखांनी विभागाकडे रोखापालाकडे पैसे भरल्याच्या चालानासह जमा केलेले नोंदणी अर्ज विद्यार्थी विभागात दि. 15/07/2018 पर्यंत सादर करावेत.

जुन्या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी जुने विषयांची परीक्षा घेणे बंद झाल्यामुळे नव्या अभ्यासक्रमातील समकक्ष विषयाची नोंदणी करावी. त्याबाबत विद्यार्थ्यांनी संबंधित विभागाशी संपर्क साधावा.

प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद.

प्रत- सर्व विभागप्रमुख – स्थापत्य/यंत्र/स्वयंचल/विद्युत/अणुविद्युत/माहिती तंत्रज्ञान/संगणक/ डी.डी.जी.एम./ विज्ञान/ उपयोजित यंत्रशास्त्र/ कर्मशाळा/ ग्रंथालय/वसतिगृह /प्रशिक्षण व आस्थापना अधिकारी/ विद्यार्थी विभाग (कार्यालय).